Agrowon, 31/01/2026

देश-विदेश

# शेतकरी कंपन्यांची साडेसतरा लाख क्विंटल सोयाबीन खरेदी

## लातूर, धाराशिव, नांदेड, बीड जिल्ह्यांतील १७ बाजार समित्यांचाही पुढाकार

विकास गाढवे : ॲग्रोवन वृत्तसेवा

**लातूर :** लातूर, धाराशिव, नांदेड व बीड जिल्ह्यांतील शेतकरी कंपन्यांच्या दोनशे, तर बाजार समित्यांच्या १७ केंद्रांवर आतापर्यंत साडेसतरा लाख क्विंटल सोयाबीनची खरेदी झाली आहे. खरेदीबाबत या कंपन्यांच्या केंद्रांनी नाफेडच्या केंद्रांना मागे टाकले आहे.

कंपन्यांकडील केंद्रांवरील सोयाबीन खरेदीचे सर्वांनाच आश्चर्य असून, काही केंद्रे अडत व्यापारी व व्यापाऱ्यांशी संबंधित गोदाम व जागेत असल्यानेही खरेदीत मोठी वाढ झाल्याचे दिसत असल्याचे सूत्रांनी सांगितले. यंदा १५ नोव्हेंबरपासून नाफेडने हमीभावाने सोयाबीन खरेदीला सुरुवात केली. तसेच महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या माध्यमातून शेतकरी कंपन्या व बाजार समित्यांना खरेदी केंद्रांचे वाटप झाले. मंजुरीसोबत या केंद्रांना बारदानाही उशिरानेच मिळाला. तरीही कंपन्यांच्या केंद्रांनी नाफेडच्या केंद्रांना काही काळातच मागे टाकले.



पणन मंडळाच्या येथील विभागीय कार्यालयांतर्गत लातूर, नांदेड, बीड व धाराशिव जिल्हे येतात. यात लातूर जिल्ह्यात सर्वाधिक १०५ केंद्रे असून, त्यात सहा बाजार समित्यांच्या केंद्रांचा समावेश आहे. या केंद्रांवर नोंदणी केलेल्या ५८ हजार १९३ पैकी आतापर्यंत ४२ हजार ६१२ शेतकऱ्यांनी सुमारे ९ लाख ६५ हजार ५४९ क्विंटल सोयाबीनची हमीभावाने विक्री केली आहे. धाराशिव जिल्ह्यात दोन बाजार समित्या व २७ शेतकरी कंपन्यांच्या मिळून २९ केंद्रांवर आतापर्यंत १ लाख ९४ हजार १४५ क्विंटल खरेदी झाली आहे. या केंद्रांवर नोंदणी केलेल्या १२ हजार ११० पैकी ८ हजार ७७२ शेतकऱ्यांनी हमीभावाने सोयाबीनच्या विक्रीला प्राधान्य दिले आहे. नांदेड जिल्ह्यातील ४६ शेतकरी कंपन्या, तर सहा बाजार समित्यांच्या केंद्रांवर आतापर्यंत २४ हजार ५४५ शेतकऱ्यांनी ४ लाख ९६ हजार ५९८ क्विंटल सोयाबीनची विक्री केली आहे. या केंद्रांवर ४८ हजार ३०७ शेतकऱ्यांनी हमीभावाने सोयाबीन विक्रीसाठी नोंदणी केली होती.

बीड जिल्ह्यात दोन बाजार समित्यांसह ३० शेतकरी उत्पादक कंपनी व गटांनी खरेदी केंद्र सुरू केली आहेत. आतापर्यंत या केंद्रांवर ११ हजार ६३५ शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून, साडेचार हजार शेतकऱ्यांनी ९८ हजार ५८८ क्विंटलची विक्री केली आहे.

### शेतकरी कंपन्यांची खरेदी

- एकूण खरेदी केंद्रे : २१७
- बाजार समित्यांची केंद्रे : १७
- नोंदणी केलेले शेतकरी : १ लाख ३० हजार ३२५
- विक्री केलेले शेतकरी : ८० हजार ४२९
- सोयाबीन खरेदी : १७ लाख ५४ हजार ९९१ क्विंटल
- बाजार समित्यांकडून सोयाबीन खरेदी : ८० हजार ८०१ क्विंटल

Agrowon, 30/01/2026

# मध्यस्थांपासून शेतकऱ्यांची सुटका, शेतमालाला मिळेल वाजवी 'ई-नाम'

## लवकरच राज्यामधील बाजार समित्यांना 'राष्ट्रीय बाजार' दर्जा मिळणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** वार्षिक किमान ८० हजार टनांहून अधिक उलाढाल असलेल्या आणि दोन वा त्यापेक्षा अधिक राज्यांतून कृषीमालाची आवक होणाऱ्या बाजार समित्यांना 'राष्ट्रीय बाजार' दर्जा देण्यात येणार आहे. यामुळे शेतमालाला योग्य भाव मिळण्यासह सर्व व्यवहार डिजिटल पद्धतीने नोंदवले जातील. ई- नाम प्रणालीशी जोडल्यामुळे शेतकरी मध्यस्थाविना देशभरातील ग्राहकांशी व्यवहार करू शकतील आणि देशभरातील ग्राहकांशी थेट झटपट व्यवहार करू शकणार आहेत. शेतकऱ्यांसह ग्राहकांना याचा फायदा होणार आहे.

प्रमुख बाजार समित्यांना लवकरच 'राष्ट्रीय दर्जा' मिळणार आहे. यासाठी हलचाली सुरू




## बाजाराच्या राष्ट्रीय दर्जाचे हे आहेत फायदे

देशभरातील अनेक बाजार समित व्यापाऱ्यांकडून बोली मिळू शकते. बाजारात जाण्यासाठी शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसा वाचतो.

**ई -नाम पूर्णपणे पारदर्शक आहे, जेणे करून शेतकऱ्यांना कोणत्याही फसवणुकीला सामोरे जावे लागणार नाही.**

शेतकरी मोबाईल किंवा संगणकावरून पिकांची आरामात विक्री करू शकतात. यासाठी सर्वप्रथम शेतकऱ्याला ई-नाम पोर्टलवर नोंदणी करावी लागेल.

## असे राहणार संचालक मंडळ

समित्यांवर सनदी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील शासन नियुक्त प्रशासकीय मंडळाची नियुक्तीची होणार आहे. समित्यांवर आता शासन नियुक्त २३ जणांच्या प्रशासकीय मंडळाची नियुक्तीची करण्यात येणार आहे. यात व्यापारी, शेतकरी व संचालक मंडळातील काही सदस्य असण्याची शक्यता आहे.

## ई-नाम म्हणजे काय?

ई-नाम हा एक प्रकारचा ऑनलाइन प्लॅटफॉर्म आहे, ज्याद्वारे शेतकरी देशाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात बसलेल्या व्यापाऱ्यांना त्यांची पिके आरामात विकू शकतात. देशातील सर्व बाजारपेठा या व्यासपीठावर एकत्र जोडल्या गेल्या आहेत. ज्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांना चांगला भाव मिळतो.

# सुरतमध्ये बाजार समित्यांच्या राष्ट्रीय परिषदेस आज प्रारंभ

- 'नॅशनल कौन्सिल फॉर ॲग्रिकल्चर मार्केटिंग बोर्ड' आयोजन
- फळे-भाजीपाला मूल्यवर्धनावर होणार विचारमंथन

**पुणे** : बाजार समित्यांमध्ये फळे-भाजीपाला हाताळणीमध्ये होणारे नुकसान टाळण्याबरोबरच, प्रक्रिया आणि मूल्यवर्धनासाठीच्या विविध उपाययोजनांमधून शेतकरी आणि बाजार समित्यांना उत्पन्नाचे नवीन मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी बाजार समित्यांच्या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेला आजपासून (ता. २१) सुरत येथे प्रारंभ होणार आहे. देशातील सर्व राज्यांच्या पणन मंडळांची शिखर संस्था असलेल्या 'नॅशनल कौन्सिल फॉर ॲग्रिकल्चर मार्केटिंग बोर्ड'ने परिषदेचे आयोजन केले आहे.

फळे-भाजीपाल्याचे काढणीपश्चात नुकसान आणि बाजार समित्यांमधील हाताळणी यात होणाऱ्या नुकसानीमुळे कोट्यवधी रुपयांचा फटका बसतो. हे नुकसान टाळण्यासाठी शेतापासून ते ग्राहकांपर्यंत पॅकिंग, वाहतूक आणि हाताळणी या विविध टप्प्यांवर नुकसान टाळण्यासाठी या परिषदेत बोर्डाकडून विविध उपाययोजनांवर चर्चा केली जाईल. तसेच प्रक्रिया आणि मूल्यवर्धनासाठी करावयाच्या विविध उपाययोजनांवर परिषदेमध्ये विविध आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

## सुरत बाजार समितीस भेट

सुरत बाजार समितीमधील फळे-भाजीपाल्याच्या वेस्टेजवर आधारित बायो सीएनजी प्रकल्प, कंपोस्ट खत प्रकल्प, जैविक खते, पशुखाद्य प्रकल्प, बाजार समितीचे आर्थिक व्यवस्थापन आदी गोष्टी परिषदेत सहभागी होणारे सदस्य अभ्यासतील.

## 'एडीबी'चा नवीन प्रकल्प लवकरच

अशियायी विकास बँकेद्वारे (एडीबी) बाजार समित्यांमधील शेतीमालाचे नुकसान, प्रक्रिया आणि मूल्यवर्धनासाठी लवकरच प्रकल्प राबविण्यात येणार असल्याचे पणन विभागातील सूत्रांनी सांगितले. फळे-भाजीपाल्याची मोठ्या प्रमाणावर आवक असलेल्या राज्यातील निवडक बाजार समित्यांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात येणार असून, यासाठीही सुरत येथील परिषदेमध्ये विचारमंथन होणार आहे.

Agrowon, 18/01/2026

# फळे, भाजीपाला निर्यातीकरिता ठाण्यात 'मल्टी मोडल हब'

- दरवर्षी एक लाख टन हाताळणी क्षमता
- जागतिक बँकेच्या सहकार्याने बापगावात प्रकल्प

अग्रोवन वृत्तसेवा

**मुंबई :** भाजीपाला निर्यातीकरिता शेतकऱ्यांसाठी ठाणे जिल्ह्यातील मौजे बापगाव (ता. भिवंडी) येथे सर्वोपयोगी 'मल्टी मोडल हब' व टर्मिनल मार्केटची उभारणी करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य कृषी पणन महामंडळाला सुमारे ७ हेक्टर जमीन उपलब्ध करून देण्यास शनिवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या जागेवर जागतिक बँक व महाराष्ट्र शासन यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) या प्रकल्पाच्या माध्यमातून हब, टर्मिनल उभारण्यात येणार आहे. यासाठी ९८ कोटी ६६ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ही जमीन राज्य कृषी पणन महामंडळाला वर्ग - २ धारणाधिकाराने विनामूल्य दिली जाणार असून, या ठिकाणी व्हेपर हिट ट्रीटमेंट, प्लँट विकिरण, पॅक हाउस सुविधा, तसेच फळे- भाजीपाला साठवणुकीकरिता सुविधांची उभारणी केली जाणार आहे. या ठिकाणी आंबा,

पान २ वर »

फळे, भाजीपाला निर्यातीकरिता ठाण्यात 'मल्टी मोडल हब'

» पान १ वरून

मसाले, पशुखाद्य यांच्यावर विकिरण प्रक्रियेद्वारे निर्जलीकरण करण्यात येणार आहे.

या प्रकल्पामुळे दरवर्षी एक लाख टन शेतमालाची हाताळणी होईल. तसेच, त्यामुळे ठाणे जिल्ह्यासह राज्यभरातील शेतकऱ्यांसाठी मोठी सुविधा निर्माण होणार असून यातून शेतमाल निर्यातीस प्रोत्साहन मिळणार आहे. शेतमालाची गुणवत्ता सुधारणे, प्रक्रिया करणे या गोष्टी सुलभ होणार आहेत. याठिकाणी व्यापारी व निर्यातदार यांना एकाच छताखाली आणले जाणार आहे. यातून निर्यात आणि लॉजिस्टिक सेवांसाठी आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. निर्यातवाढीमुळे परकीय चलन मिळणार आहे. जगभरातील बाजारपेठा व प्रकल्पांचा अभ्यास करून एकात्मिक असा प्रकल्प उभारण्यात येणार असल्यामुळे शेतमालाचे काढणीपश्चात नुकसान कमी होण्यास व मालाचा दर्जा सुधारण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पामुळे रोजगार निर्मिती होणार असून लगतच्या परिसरातील व्यवसायांना देखील चालना मिळणार आहे, असा सूर मंत्रिमंडळ बैठकीत व्यक्त झाला.